Vol 6 Issue 5 November 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 5 | November - 2016

Golden Research Thoughts

# आंबेडकरी राजकीय चळवळ आणि युतीचे राजकारण

प्रा.डॉ.भगवान माने
राज्यशास्त्र विभाग आणि संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

सामाजिक परिवर्तनाची जगातील महान चळवळ म्हणून आंबेडकरी चळवळीकडे पाहिले जाते. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या महान संदेशामुळे आंबेडकर अनुयायांनी केलेली प्रगती इतर कोणत्याही चळवळीपेक्षा अतुलनीय आहे. आणि या चळवळीची प्रेरणास्थान तथागत गौतमबुध्द, क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि छत्रपती राजर्षी शाहू महाराज आहेत. आंबेडकर चळवळीचे स्वरूप केवळ राजकीय नाही, तर तिचे विस्तृत स्वरूप धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक आहे. दलित साहित्य, दलित पँथर्स, दलित मुक्तीसेना, आत्मसन्मान चळवळी इत्यादी आंबेडकर चळवळीची अपत्ये आहेत.

सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक चळवळीचा अभ्यास करता असे दिसून येते की, चळवळीचा सामूहिक सहभाग आणि आंतरक्रिया जेवढी जास्त, तेवढे सामाजिक किंवा राजकिय चळवळीचे यश अधिक असते. राजकीय चळवळीचा विचार करता राजकीय पक्षाची विचारसरणी, राजकीय पक्षाचा नेता, त्याच्या अंगी असणारे नेतृत्वगुण, संघटनकौशल्य, पक्षबांधणी, पक्षाचे संघटन, राजकीय पक्षातील किंवा चळवळीतील कार्यकर्त्याची पक्षावर असणारी निष्ठा, चळवळीमध्ये कार्यकर्त्यांना देण्यात येणारे प्रशिक्षण यावर राजकीय चळवळीचे भवितव्य अवलंबून असते.

चळवळीचे स्वरूप स्थिर नसून प्रवाही असते. आणि परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल होतात. 'बदल' हा चळवळीचा स्थायीभाव आहे. आणि आंबेडकरी चळवळसुध्दा त्यास अपवाद नाही.

एलिनॉर झेलियट यांच्या मते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले राजकीय विचार प्रथम १९१९ मध्ये अखिल भारतीय दलित परिषदेत व्यक्त केले ते पुढीलप्रमाणे आहेत.

''एका राष्ट्राने दुस-या राष्ट्रावर हुकमत गाजवू नये, या काँग्रेसच्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. परंतु नुसते एवढेच मान्य करून चालणार नाही. समाजातील एका वर्गाने दुस-या वर्गावरही सत्ता गाजवता कामा नये. हे देखील या ठिकाणी मला स्पष्टपणे बजावायचे आहे.'' यावरून असे स्पष्ट होते की पुढील काळात आपण राजकीय सत्ता मिळविणे आवश्यक आहे याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी करून दिली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात कायदेमंडळाकडून राज्यकारभार केला जात होता. आणि काही राजकीय पक्षांनी निवडणुका लढविल्या होत्या. पहिले कायदेमंडळ १९२१-१९२३ या कालखंडात अस्तित्वात आले होते. १९२४-२५ मध्ये गव्हर्नर जनरलने हिंदुस्थानातील कायदेमंडळातील निवडणुकांच्या अधिकारात वाढ केल्याने 'स्वराज्यपक्षाने' निवडणुकीत भाग घेतला होता. त्यानंतर १९२७-१९३० मध्ये तिसरे कायदेमंडळ, १९३२-१९३४ मध्ये चौथे कायदेमंडळ आणि २० मे १९३४ मध्ये पाचवे कायदेमंडळ अस्तित्वात आले होते. प्रांतिक कायदेमंडळात काँग्रेसचे वर्चस्व होते. १९३७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसला विरोध करणारा प्रबळ विरोधी पक्ष नव्हता. काँग्रेसने जर एकतर्फी निवडणुका जिंकल्या तर लोकशाहीच्या भवितव्याला धोका निर्माण होईल, म्हणून काँग्रेसला विरोध करण्यासाठी सर्व भारतीयांचा समावेश असलेला राजकीय पक्ष निर्माण, करण्याच्या उद्देशाने नवा राजकीय पक्ष स्थापण्याचा डॉ. आंबेडकर यांनी विचार केला होता, आणि तो विचार त्यांनी स्वतंत्र मजूरपक्षाच्या स्थापनेतून पूर्णत्वास आणला.

***1) स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना***

– इंग्लंडमधील हुजूरपक्षावर मजूरपक्ष ज्याप्रमाणे नियंत्रण ठेवतो, त्याप्रमाणे भारतात काँग्रेस पक्षावर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांनी १९३६ मध्ये स्वतंत्र मजूरपक्षाची स्थापना केली. मजूर पक्षामध्ये समाजातील सर्व स्तरांतील कार्यकर्त्याचा समावेश करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथम सोशल इंजिनिअरींग केले होते. त्यामध्ये आयु. दादासाहेब गायकवाड, डी.व्ही.प्रधान, अनंतराव चित्रे, सुरबानाना टिपणीस, कद्रेकर, आर.आर.भोळे इत्यादींचा समावेश होता.

*स्वतंत्र मजूर पक्षाचे युतीचे राजकारण –* स्वतंत्र मजूर पक्षाने देशातील गरीब मध्यमवर्ग, शेतकरी, नोकरदार, शेतकरी, शेतकरी कुळे आणि सर्व स्तरातील मजुरांना आपल्या पक्षाचा केंद्रबिंदू मानले होते. या काळात लालबावटा चळवळ कामगार चळवळीचे कार्य करीत होती. परंतु कम्युनिस्ट चळवळ भारतात यशस्वी होऊ शकत याची कल्पना असल्यामुळे लालबावटा चळवळीशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी युती केली नाही.

१९३७ च्या निवडणूकीत स्वतंत्र मजूर पक्षाने कॉंग्रेसला विरोध केला होता. प्रांतिक सरकारच्या कायदेमंडळात मजूर पक्षाने अस्पृश्यांसाठी राखीव ठेवलेल्या १५ जागांवर १३ उमेदवार निवडून आले होते. आणि सर्वसाधारण जागेवर वरील जातीतील ०२ उमेदवार निवडून आले, हे स्वतंत्र मजूरपक्षाच्या युतीचे यश म्हणावे लागेल.

क्रिप्स योजनेमुळे भारतीयांना नवीन संविधान देण्याचे धोरण स्वीकारले होते. भारतीय संविधान अस्पृश्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि सुरक्षिततेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर नेत्याची भूमिका स्वीकारली होती. परंतु १९४२ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाचे विसर्जन केले. यावरून असे स्पष्ट होते की, अस्पुश्यांवर कोणतेही संविधान लादू नये, संविधानात त्यांच्या हक्कांना डावलू नये आणि इतर अल्पसंख्याकाप्रमाणे आपल्या समाजाचे राजकीय प्रतिनिधीत्व आवश्यक असल्याने अखिल भारतीय स्तरावर अस्पृश्य समाजाच्या प्रतिनिधीत्वासाठी ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशन या नव्या पक्षाची स्थापना करण्यात आली.

*2) ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशन –* भारतातील विविध प्रांतातील अस्पृश्यांना आणि त्यांच्या नेत्यांना एकत्र करून अस्पृश्यांचा एक नवा पक्ष स्थापन करण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४२ मध्ये ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. अस्पृश्यांमध्ये असणा–या शेकडो जाती–जमातींचे दुःख समान आहे आणि मुक्तीचा मार्गही एकच आहे. तो म्हणजे अस्पृश्यांच्या हातात राजकीय सत्तेची भागीदारी देणे होय. ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशनने आपल्या जाहीरनाम्यात समान संधी, स्वातंत्र्य, समता, प्रत्येक भारतीयाचा उत्कर्ष, समता नाकारल्यास समतेच्या हक्काचा लढा अशा मौलिक आश्वासनांचा समावेश केला होता.

*शेडयूल्ड कास्ट फेडरेशनचे युतीचे राजकारण –* ११ मार्च १९४६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशनने निवडणूकीत भाग घेतला होता. परंतु कॉंग्रेस पक्षाने शेडयूल्ड कास्ट फेडरेशन हा जातीयवादी देशद्रोही पक्ष आहे असा खोटा प्रचार केला. यावेळी अस्पृश्यांसाठी संयुक्त मतदारसंघ होते. या निवडणूकीत सवर्ण हिंदूंनी अस्पृश्य मतदारांना मतदान केले नाही. त्यामुळे शेडयूल्ड कास्ट फेडरेशनचा एकही उमेदवार निवडून आला नाही. यावरून असे स्पष्ट होते की, आजही राखीव मतदारसंघातील कॉंग्रेस किंवा इतरपक्षांचे अनुसूचित जातीचे उमेदवार निवडून येतात, परंतु आंबेडकरी राजकीय चळवळीतील उमेदवारांना जाणूनबुजून पराभव केला जातो.

१९५१ मध्ये शेडयूल्ड कास्ट फेडरेशनने आपल्या जाहीरनाम्यात युती संदर्भात पुढील प्रकारचे निर्देश दिले होते.

१) युती करणा–या पक्षाचे धोरण स्पष्ट असावे. २) युतीच्या पक्षाचे धोरण शेडयूल्ड कास्ट फेडरेशनच्या धोरणास अनुकूल असावे. ३) युती करणा–या पक्षांनी अस्पृश्यांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीस सहकार्य करावे. ४) युतीच्या पक्षाने शेडयूल्ड कास्ट फेडरेशनच्या अंतर्गत व्यवस्थेत हस्तक्षेप करू नये.

शेडयूल्ड कास्ट फेडरेशनने १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत भाग घेतला होता. या निवडणुकीचे वैशिष्टय म्हणजे संयुक्त मतदार संघाऐवजी संविधात्मक तरतुदीनुसार राखीव मतदार संघातून शेडयूल्ड कास्ट फेडरेशनचे उमेदवार उभे केले, परंतु यावेळी कॉंग्रेसपक्षाने सहकार्याच्या भूमिकेऐवजी अस्पुश्य समाजाचा विश्वासघात करून कुटीलनीतीचे राजकारण करून, राखीव मतदार संघातून अस्पुश्यांचे प्रतिनिधी उभे करून शे.का.फे. चा पुन्हा एकदा पराभव केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५४ मध्ये समाजवादी पक्षाशी युती केली होती. समाजवादी पक्षाने आपले खरे स्वरूप १९५४ च्या भंडारा पोटनिवडणूकीत दाखवले. या निवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात अशोक मेहता यांना उभे केले होते. यावेळी अशोक मेहता निवडून आले. निवडणूकीनंतर २० एप्रिल १९५४ मध्ये निवडणुकीचे अपयश आणि युतीच्या अनुषंगाने भंडारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्यकर्त्यांना पुढीलप्रमाणे उपदेश केला होता.

''मी अपयशाची पर्वा कधीच करत नाही. निवडणुकांमध्ये केवळ जागा मिळविणे शे.का.फे.चे ध्ये नाही. तर ते एक साधन आहे. साध्य नव्हे. आपले साध्य व ध्येय अस्पृश्य जनतेचा उध्दार करणे हे आहे. शे.का.फे.ला अपयश येणे हे वा–याने झोडपलेल्या झाडासारखे आहे. परंतु त्यामुळे फेडरेशनरूपी झाडाचे मूळ मरून गेले असा त्याचा अर्थ लावणे चुकीचे ठरेल.'' युतीच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे असे म्हणाले की, ''अस्पृश्य समाजाने इतर समाजातील समविचारी लोकांशी, राजकीय पक्षांशी युती करावी. त्याशिवाय आपल्याला यश मिळणार नाही.''

*शेडयूल्ड कास्ट फेडरेशनला आलेले अपयश –* या पक्षावर जातीयवादी पक्ष असा आरोप केला जात असे. संविधानाच्या अंमलबजावणीनंतर, लोकशाही व्यवस्थेत जातीवर आधारित पक्षाचे अस्तित्व ठेवणे लोकशाहीच्या विरोधी असल्याने, देशातील सर्व समाजातील लोकांचेसाठी तसेच अस्पृश्य आणि दबलेल्या समाजातील एक नवीन पक्ष स्थापन करण्याचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला होता. यावरून असे स्पष्ट होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनामध्ये केवळ अस्पृश्य समाजाच्या उन्नतीचा विचार नव्हता. तर देशातील उच्च आणि कनिष्ठ जाती किंवा धर्म असो, सर्व समाजातील दबलेल्या जनतेच्या उन्नतीसाठी राजकीय पक्षाने कार्य करावेत ही भूमिका घेतली होती.

*संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि शे.का.फे. युतीचे राजकारण –* महाराष्ट्र राज्य स्थापन होण्यापूर्वी मराठी भाषा आणि अस्मितेच्या राजकारणाला प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेडयूल्ड कास्ट फेडरेशनने युतीच्या राजकारणाद्वारे मोठे सहकार्य केले होते.

त्याचबरोबर भाषिक प्रांतरचनेमुळे प्रांता-प्रांतात हेवेदावे वाढतील आणि अस्पृश्य आणि दबलेल्या समाजाच्या विरोधी भावना वाढीस लागून अस्पृश्य समाजाला सत्तेच्या राजकारणाच्या परिघाबाहेर रहावे लागेल अशी शंका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केली होती.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू करण्यापूर्वी संयुक्त महाराष्ट्र समितीचे एस.एम.जोशी, श्रीपाद डांगे, प्रल्हाद केशव अत्रे, दत्ता देशमुख, खाडिलकर इत्यादी नेत्यांनी दिल्ली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट घेऊन शेडयूल्ड कास्ट फेडरेशनने संयुक्त महाराष्ट्र समितीशी युती करून कॉंग्रेसला सत्तेपासून खेचण्यासाठी आणि महाराष्ट्राला मदत करण्यासाठी युती करावी अशी विनंती केली होती. (कापडे डॉ. दीपकराजः सप्टेंबर सुगावा २००६)

१६५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शेडयूल्ड कास्ट फेडरेशन आणि संयुक्त महाराष्ट्र समितीची पुढील अटीवर युती झाली होती.

१) संयुक्त प्रांतील राखीव जागा शेडयूल्ड कास्ट फेडरेशनमार्फत लढविल्या जातील.
२) संयुक्त महाराष्ट्र समितीने सर्वसाधारण जागेवरून शे.का.फे.चे उमेदवार निवडून आणले पाहिजेत.
३) कॉंग्रेसविरोधी पक्ष म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीची कार्य करावे.
४) खेडयातील मागास जनतेवरील अन्याय निवारण्याचे कार्य करण्याची जबाबदारी संयुक्त महाराष्ट्र समितीची असेल आणि त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक विकासाचे बाबतीत समिती सदैव प्रयत्नशील राहील.

१६५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत शे.का.फे.ने संयुक्त महाराष्ट्र समितीशी युती केल्यामुळे, दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली लोकसभेसाठी ६ उमेदवार आणि विधानसभेसाठी १३ उमेदवार विजयी झाले. अत्यंत यशस्वी युती म्हणून या निवडणुकांकडे पाहिले जाते. ६ डिसेंबर १६५६ रोजी डॉ. बाबासाहेबांचे महानिर्वाण झाले. परंतु या निवडणुकांची पूर्वतयारी डावपेच आणि आखणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखालीच झाली होती. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर स्थापन झालेल्या रिपब्लीकन पक्षाने आणि चळवळीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हयातीत झालेल्या युतीच्या डावपेचांचे अनुकरण करावे, तरच बदलत्या राजकीय समीकरणात आंबेडकरी चळवळ टिकू शकेल. त्याचबरोबर धर्मनिरपेक्ष आणि जातीयवादी असे वर्गीकरण बाजूला ठेवून, सत्तेचे वाटेकरी होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजपा, शिवसेना यांच्याकडे उमेदवारीचे बलुते मागण्याचे सोडून आंबेडकरी जनतेची ताकद मतपेटीद्वारने दाखवून राजकीय सत्ताबदल आणि निर्णयप्रक्रियेत बदल घडविणारी प्रभावी चळवळ निर्माण करणे हेच आंबेडकरी चळवळी पुढील मोठे आव्हान आहे.



*प्रा.डॉ.भगवान माने*
*राज्यशास्त्र विभाग आणि संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org